# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नंदुरबार

**सुनंदा पाटील**
जिल्हा क्रीडा अधिकारी,
नंदुरबार

# जिल्हा क्रीडा संकुलात निर्माण करण्यात आलेल्या सुविधा

- मल्टीपर्पज इनडोअर हॉल (तीन बॅडमिंटन  सिंथेटींक  फ्लोरींगचे)
- जलतरण तलाव
- सिंथेटीक लॉन टेनिस मैदान
- शुटींग रेंज हॉल
- बॉक्सिंग रिंग
- लॉन टेनिस सिंथेटिक कोर्ट
- 400 मीटर रनिंग ट्रॅक,  फुटबॉल / हॉकी क्रीडांगणासह,
- स्टेज  व प्रेक्षक गॅलरी - 1000 प्रेक्षकांच्या बैठक व्यवस्थेसह.
- बास्केटबॉल, रोलबॉल मैदान
- अद्ययावत व्यायामशाळा
- कॅफेटेरिया
- मुलां-मुलींकरीता अद्यावत वसतीगृह इमारत
- अधिकारी / कर्मचारी निवास स्थान

# जिल्हा क्रीडा संकुलात अदयावत करावयाच्या क्रीडा सुविधा

- इनडोअर हॉल दुरुस्ती करणे – सदर इनडोअर हॉलला अॅकोस्टिक ट्रीटमेन्ट करणे, फर्निचर, साउंड सिस्टीम तयार करणे वआधुनिक पध्दतीने विद्युतीकरण करणे गरजेचे आहे. तसेच स्वच्छता गृहातील चेंजींग रुम, टॉयलेट व बाथरुम दुरूस्त करणे, ड्रेनेजची पाईपलाईन दुरूस्त करणे आवश्यक आहे.
- जलतरण तलाव दुरुस्ती करणे - जलतरण तलावासाठी स्वच्छता गृहातील चेंजींग रुम, टॉयलेट व बाथरुम दुरूस्त करणे, ड्रेनेजची पाईपलाईन बदलणे गरजेचे आहे. जलतरण तलावाशेजारी बेबी पुल हा लहान  व नवीन खेळांडुकरीता आवश्यक आहे. तसेच सुरक्षिततेच्याय दृष्टीकोनातुन जलतरण तलावाभोवती संरक्षक भिंतीची उंची वाढविणे आवश्यक आहे.
- 400 मीटर रनिंग ट्रॅक सिंथेटीक करणे - सद्यस्थितीत, 400 मी. रनिंग ट्रॅक हा बराच खराब झालेला आहे.  त्याचप्रमाणे, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील सर्व स्पर्धा या सिंथेटिक ट्रॅकवर होत असल्याने सिंथेटिक ट्रॅकचा जिल्ह्यातील खेळाडूंना सराव व्हावा या उद्देशाने सिंथेटिक ट्रॅक करणे आवश्यक आहे.
- मुलां-मुलींकरीता वसतीगृह इमारत दुरुस्ती करणे – सद्यस्थिती वसतीगृहात मुलां मुलीकरीता 12 डॉर्मिटरीज आहेत सदर वसतीगृहातील टॉयलेट व बाथरुम दुरूस्त करणे, ड्रेनेजची पाईपलाईन बदलणे गरजेचे आहे. तसेच विद्युतीकरण नव्याने करणे, रंगरंगोटी करणे आवश्यक आहे.



# जिल्हा क्रीडा संकुलात नव्याने करावयाच्या क्रीडा सुविधा

- **विविध खेळांसाठी इनडोअर हॉल इमारत बांधणे –** जिल्हा क्रीडा संकुल परिसरात बॅडमिंटन करिता इनडोअर हॉल उपलब्ध आहे. योगा, टेबल टेनिस, मार्शल आटर्सचे क्रीडा प्रकार, कुस्ती, बुध्दीबळ, कॅरम या क्रीडा प्रकाराकरिता तसेच सभा,सेमिनार, समुपदेशन, प्रशिक्षण वर्गाकरिता किमान 6 सर्व सोयींनी युक्त असे अद्यावत हॉल असलेल्या बहुउद्देशीय इमारतीची आवश्यकता आहे.
- **मुलां- मुलींकरीता स्वतंत्र प्रसाधन गृह बाधणे करणे -** सद्यस्थितीत संकुलामध्ये असलेली स्वच्छतागृह अतिशय वाईट स्थितीमध्ये असुन त्याची दुरुस्ती करुनही उपयोग होणार नाही. त्यामुळे संकुलामध्ये येणा-या खेळांडुकरिता अद्यावत व मुला-मुलीसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची आवश्यकता आहे.
- **धनुर्विद्या प्रशिक्षण केंद्र -** नंदुरबार जिल्हा हा आदिवासी बहुल असुन येथील खेळांडुमध्ये धनुर्विद्या या क्रीडा प्रकारासाठी असलेली नैसर्गिक गुणवत्ता ही मुबलक प्रमाणात आढळुन येते. येथील खेळांडुमधील या सुप्त क्रीडागुणांना विकसित केल्यास, जिल्हयातुन किमान राष्ट्रीय दर्जाचे खेळांडु तयार होतील.या करिता अद्यावत सुविधेसह धनुर्विद्या प्रशिक्षण केंद्र तयार करण्याची आवश्यकता आहे.
- **मुलां-मुलींकरीता अद्यावत वसतीगृह इमारत नव्याने बांधणे –** सद्यस्थिती वसतीगृहात मुलां मुलीकरीता 12 डॉर्मिटरीज असुन एकुण 120 खेळाडूंची निवास व्यवस्था होवू शकते तसेच शालेय क्रीडा स्पर्धेत समावेश असलेल्या जास्तीत जास्त क्रीडा प्रकाराच्या राज्यस्तर स्पर्धेत किमान 500 खेळाडू सहभागी होतात. त्यामुळे, प्रत्येक क्रीडा स्पर्धेच्या वेळी बाहेरून येणाऱ्या खेळाडूंची निवास व्यवस्था क्रीडा संकुलाच्या बाहेर करावी लागते व परिणामी वाहतुकीचा खर्च वाढतो तसेच सुरक्षेचा प्रश्न देखील निर्माण होतो त्यामुळे नविन अदयावत वसतीगृह इमारत बांधणे आवश्यक आहे.



# नंदुरबार जिल्हयातील तालुका क्रीडा संकुलांचा आढावा

- **तालुका क्रीडा संकुल, नंदुरबार –** सदर तालुका क्रीडा संकुलाचे आराखडे तयार करण्यात आलेले असुन अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. अंदाजपत्रक तयार झाल्यावर मान्यतेकरीता संचानालयास सादर करण्यात येईल.
- **तालुका क्रीडा संकुल, शहादा –** सदर तालुका क्रीडा संकुलात इनडोअर हॉल, 200 मी ट्रॅक, विविध खेळाची मैदाने तयार करण्यात आलेले असुन सदयस्थीत दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच सुधारित शासन निर्णयान्वये अंदाजपत्रक व आराखडे तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. अंदाजपत्रक तयार झाल्यावर मान्यतेकरीता संचानालयास सादर करण्यात येईल.
- **तालुका क्रीडा संकुल, तळोदा –** सदर तालुका क्रीडा संकुलात इनडोअर हॉल, विविध खेळाची मैदाने तयार करण्यात आलेले असुन सदयस्थीतीत दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच सुधारित शासन निर्णयान्वये अंदाजपत्रक व आराखडे तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. अंदाजपत्रक तयार झाल्यावर मान्यतेकरीता संचानालयास सादर करण्यात येईल.
- **तालुका क्रीडा संकुल, नवापूर –** सदर तालुका क्रीडा संकुलात इनडोअर हॉल, सदयस्थीतीत दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच सुधारित शासन निर्णयान्वये अंदाजपत्रक व आराखडे तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. अंदाजपत्रक तयार झाल्यावर मान्यतेकरीता संचानालयास सादर करण्यात येईल.
- **तालुका क्रीडा संकुल, धडगाव –** सदर तालुका क्रीडा संकुलाकरीता जागा अप्राप्त आहे. धडगाव येथील नर्मदा कॉलनीची जागा मागणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.
- **तालुका क्रीडा संकुल, अक्कलकुवा –** सदर तालुका क्रीडा संकुलाकरीता जागा अप्राप्त आहे. अक्कलकुवा येथील जवाहर नवोदय विद्यालयाची क्रींडांगणाची जागा मागणी प्रस्ताव नवोदय समिती कडे पाठविण्यात आलेला आहे.











# जिल्हा क्रीडा संकुल अंतर्गत खेलो इंडिया सेंटर

तालुका क्रीडा संकुल, नंदुरबार – खेलो इंडिया प्रशिक्षण केंद्रासाठी शासनाकडुन आवर्ती रु.2.00 लक्ष व अनावर्ती रु.5.00 लक्ष असे एकुण 7.00 लक्ष रु. प्राप्त झाले आहे. सदर अनुदानतुन एक क्रीडा मार्गदर्शक दि. 01 एप्रिल 2022 नियुक्ती करण्यात आली असुन तयांना दरमहा रु.18000/- प्रमाणे मानधन अदा करण्यात येत आहे. तसेच क्रीडा प्रशिक्षण केंद्रातील खेळाडूंसाठी आवश्यक क्रीडा साहित्य, क्रीडा गणवेश, लेखा परिक्षणाचे देयक व इतर अनुशंगिक खर्च असे एकुण रु.4,41,802/- इतकी रक्कम खर्च झालेली असुन उर्वरीत रक्कम रु.2,58,198/- रकमेतुन क्रीडांगण दुरुस्ती व क्रीडा मार्गदर्शकांचे मानधन खर्च भागविण्यात येणार आहे.



# जिल्हा क्रीडा संकुल अंतर्गत खेलो इंडिया सेंटर

खेलो इंडिया प्रशिक्षण (मैदानी) केंद्राची दि. 01 एप्रिल 2022 पासुन सुरुवात करण्यात आली. सदर क्रीडा प्रशिक्षण केंद्रात मुले 18 व मुली 15 एकुण 33 खेळाडुंची मैदानी चाचणी व्दारे निवड करण्यात आली. सदर खेळाडुंना नियमित पणे सकाळी 6.00 ते 8.00 व सायंकाळी 4.00 ते 6.00 या दोन सत्रात प्रशिक्षण तज्ञ प्रशिक्षकामार्फत देण्यात येते. सद्यस्थितीत प्रशिक्षण केंद्रातील 08 खेळाडुंची राज्यस्तर मैदानी संघटने मार्फत संपन्न झालेल्या राज्यस्तर मैदानी क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविला होता व एकलव्य माडर्न रेसीडेंशीयल शाळे मार्फत राष्ट्रीय मैदानी क्रीडा स्पर्धेसाठी 15 खेळाडुंची निवड झालेली असुन मा.जिल्हाधिकारी, नंदुरबारयांच्या हस्ते गौरविण्यात आलेले आहे.

सदर खेलो इंडिया प्रशिक्षण केंदाकरीता शासनाकडुन आवर्ती रु.2.00 लक्ष व अनावर्ती रु.5.00 लक्ष असे एकुण 7.00 लक्ष रु. प्राप्त झाले आहे. सदर अनुदानतुन एक क्रीडा मार्गदर्शक दि. 01 एप्रिल 2022 नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना दरमहा रु.18000/- प्रमाणे मानधन अदा करण्यात येत आहे. तसेच क्रीडा प्रशिक्षण केंद्रातील खेळाडूंसाठी आवश्यक क्रीडा साहित्य, क्रीडा गणवेश, लेखा परिक्षणाचे देयक खर्च भागविण्यात आलेला आहे.

